## निवडक



खोतीगाव : येडा येथे काँग्रेसचे महिला सशक्तिकरण शिबिरांत उपस्थित कोंग्रेसचे नेते व स्थानिक महिला.

### खोतीगाव येथे काँग्रेसचे महिला सशक्तिकरण शिबिर

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. ३ :** घटक राज्य दिनाचे औचित्य साधून काणकोणच्या काँग्रेस परिवारातर्फे येडा खोतीगाव येथे महिला सशक्तिकरण शिबिराचे आयोजन नुकतेच करण्यात आले. या शिबिरात महिलांच्या सशक्तिकरणासाठी आवश्यक असलेल्या विविध पैलू वर उपस्थित मान्यवरांकडून प्रकाश टाकण्यात आला. या क्षेत्रात वावरणाऱ्या एकूण बारा महिलांना यावेळी सन्मानित करण्यात आले.

या शिबिराला काँग्रेसचे स्थानिक नेते जनार्दन भंडारी, काँग्रेसचे राज्य उपाध्यक्ष गास्पर कुतीन्हो, वैष्णव पेडणेकर, सिद्धार्थ गायक, महिला काँग्रेसच्या उर्सीला डिकोस्टा, खोतीगावचे माजी सरपंच दया गावकर, माजी पंच पायक वेळीप, आदिवासी महिला मंचाच्या सुवर्णा वेळीप, दिपीका गावकर व अन्य उपस्थित होत्या. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी फ्रांन्सिटा कुतीन्हो, टेसी फाल्कांव, म्युरियल व्हियेगश, आकांक्षा कुलासो यांनी खूप मेहनत घेतली.

---

### गोवा कोकणी अकादमीकडून नवीन सर्वसाधारण मंडळासाठी अर्ज

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ३ :** गोवा कोकणी अकादमीने पुढील ३ वर्षांसाठी म्हणजेच (२०२५-२०२८) नव्या सर्वसाधारण मंडळाची स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. अकादमीच्या संविधानाच्या कलम १०.१ नुसार कोकणी भाषा, साहित्य आणि संस्कृतीच्या क्षेत्रात काम करणाऱ्या नोंदणीकृत संस्थाकडून अर्ज मागविले आहेत.

संस्थांनी गेल्या ५ वर्षांच्या कामकाजाचा अहवाल सादर करावा.

त्याचप्रमाणे, अकादमीच्या सर्व साधारण मंडळामध्ये प्रतिनिधित्व करण्यास इच्छिणाऱ्या व्यक्तीने आपला अर्ज गोवा कोंकणी अकादमी संचार भवन, ५ वा मजला, बीएसएनएल पाटो प्लाझा पणजी येथे कार्यालयीन वेळेत ११ जून २०२५ पर्यंत सादर करावे. अधिक माहितीसाठी श्रीमती मारिया वाझ यांच्याशी अकादमीच्या कार्यालयातील फोन क्रमांक ७७७५८९१८५७ वर सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.४५ या वेळेत संपर्क साधावा.

---

### आके मडगाव भागात आज खंडित वीजपूरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ३ :** आके मडगांव डीआयजी बंगलो ट्रान्सफोरमरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने बुधवार दि. ४ रोजी सकाळी ९ ते संध्या ६ वाजेपर्यंत डीआयजी बंगलो, सिल्वर गेट आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

त्याचप्रमाणे आके मडगांव नानूटेल ट्रान्सफोरमरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने गुरुवार दि. ५ रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत चायनिज नेस्ट, सनी स्टेशनरी आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### देऊळवाडा सूर्ला ट्रान्सफॉर्मरवर आज खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ३ :** बुधवार दि. ४ रोजी देऊळवाडा सूर्ला वीज ट्रान्सफॉर्मरवर सकाळी ९.३० ते दुपारी २ वाजता यावेळेत वीज वाहिन्याना लागणाऱ्या झाडांच्या फांद्या तोडायच्या असल्याने तसेच वीज वाहिन्यांचे देखभालीचे काम करायचे असल्याने देऊळवाडा सूर्ला परिसरात वीजपुरवठा असणार नाही. यावेळी ग्राहकांनी सहकार्य कराव, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

### सरकारी कर्मचाऱ्यांना योग दिनात सहभागी होणे सक्तीचे

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ३ :** सर्वसामान्य प्रशासन खात्याने सर्व कर्मचाऱ्यांना आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त २१ रोजी आपल्या संबंधित कार्यालय परिसरात किंवा आपल्या जवळच्या परिसरातील शाळा, महाविद्यालये, पंचायती, नगरपालिका किंवा इतर संस्थांमध्ये आयोजित होणाऱ्या योग सत्रांमध्ये सक्तीने सहभागी होण्याचा आदेश दिले आहे. तसेच आपल्या खात्याचे कार्यालय किंवा संस्थेच्या बाहेर सत्रांना उपस्थित राहणाऱ्या कर्मचाऱ्यांनी सहभागाचा पुरावा म्हणून स्वतःचा फोटो काढावा आणि तो त्यांच्या संबंधित खाते प्रमुख, कार्यालयाकडे सादर करावा.

त्याचप्रमाणे, सर्व खाते प्रमुख, कार्यालये, स्वायत्त संस्था, महामंडळाच्या प्रमुखानी आपली खाती आणि उप-कार्यालयांनी २१ जून २०२५ रोजी योग सत्रे आयोजित करण्यासाठी सर्व आवश्यक व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत आणि शक्य तितक्या आणि आवश्यक सेवांमध्ये अडथळा न आणता, योग सत्रे आयोजित करण्यासाठी त्यांच्याशी संपर्क साधणाऱ्या खाली सूचीबद्ध संस्थांना त्यांचे कार्यालय परिसर उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. २१ जून २०२५ रोजी त्यांच्या संबंधित खाते आणि उप-कार्यालयांमध्ये प्रत्येक कार्यक्रमाची नोंदणी ऽसर.ग्रीह.सीं.व्लप/ऽसर-िरपसरा वर अपलोड करावी. सर्व खाती, कार्यालय, स्वायत्त संस्था, महामंडळाच्या प्रमुखांनी आपल्या कार्यालयांनी योग सत्र आयोजित करण्यासाठी खालील कोणत्याही संघटणेकडे संपर्क करावा.

भारत स्वाभिमान ट्रस्ट, सांत इनेज, पणजी, कमलेश बांदेकर - अध्यक्ष - ९७६६६२११९६, तपोभूमी योग गुरुकुल, कुंडई, फोंडा, गोवा, ज्ञानेश्वर पाटील - अध्यक्ष - ९१३००६६३६२/७५०७७७१७५० आर्ट ऑफ लिव्हिंग ऑर्गनायझेशन गोवा, दवर्ली, मडगाव. श्रद्धा चंद्रकांत परब गोवा राज्य समन्वयक - ९४२३३०७८०९, ब्रह्मा कुमारी, पर्वरी, शोभा बहेन - ९३२५१०८२४७, पतंजली योग सांतीनेज पणजी विश्वास कोरगांवकर - ९७६६६२११९०. महिला पतंजली योग समिती, सांतिनेज, पणजी, संध्या खानोलकर - अध्यक्ष - ९७६६६२११९०.

योगासना स्पोर्ट्स असोसिएशन गोवा, डिचोली अध्यक्ष सुलक्षणा सावंत, सचिव श्री संदेश बराजणकर -९८२३५२४७४३. अंबिका योग कुटीर गोवा, गोगळ हाउसिंग बोर्ड, मडगाव, विश्वनाथ स्वार - उपाध्यक्ष - ९४२२४४२८३८, ९२८४३७९३४७.

प्रति योगयान, दुर्गावाडो, डोना पावला, निशिता गांधी - संचालक/मुख्य शिक्षिका - ८३८००७५५९९. ईशा फाऊंडेशन, गोवा, दामोदर कोचकर - सेक्टर समन्वयक - ९८२२१००३०५. पीस अँड ब्लिस असोसिएशन, गोगळ हाउसिंग बोर्ड, मडगाव, विश्वनाथ स्वार ९४२२४४२८३८, ९२८४३७९३४७. ओम नित्य दिव्य योगाश्रम, बेतोडा, फोंडा, हेमंतकुमार गावेकर - ९६३७३९७३९३. गोवा कौन्सिल ऑफ आयुर्वेद अँड अदर अलाईड इंडियन सिस्टीम्स ऑफ मेडिसिन, मोंत हिल, मडगाव, डॉ. स्नेहा भागवत - अध्यक्ष - ९०११८३४६२६. गोमंत आयुर्वेद महाविद्यालय डॉ. अनुरा बाळे - प्राचार्य - ७८७५४४९७५१. ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ आयुर्वेद, धारगळ, डॉ. संजय खेडेकर - नोडल ऑफिसर - ९५९५७४४७८८.

---

# बस्तोडा हल्ल्याप्रकरणी ३६ तासांनंतरही कोणतीही अटक नाही

## पीडित कुटुंबाची पोलिसांवर गंभीर टीका | पोलिस राजकीय दबावाखाली असल्याचा कुटुंबाचा आरोप

■ टीम दैनिक हेराल्ड



**पणजी, दि. ३ :** बस्तोडा येथे घडलेल्या हिंसक हल्ल्याच्या घटनेनंतर ३६ तास उलटून गेले तरीही अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही, अशी माहिती म्हापसा पोलिसांनी दिली आहे. या प्रकरणी पोलिसांच्या कारवाईवर पीडित कुटुंबाने तीव्र नाराजी व्यक्त केली असून पोलिसांवर हलगर्जीपणा आणि दबावाखाली काम करत असल्याचा आरोप केला आहे.

म्हापसा पोलिसांनी दिलेल्या अधिकृत निवेदनानुसार, पीडित श्रुती विवेक शिरोडकर यांनी सोमवारी रात्री दाखल केलेल्या तक्रारीनुसार अज्ञात व्यक्तींनी त्यांच्या आणि त्यांच्या पतीवर हल्ला केला. या प्रकरणी म्हापसा पोलिस ठाण्यात रात्री १:१५ वाजता गुन्हा नोंदवण्यात आला असून, कलम १२६ (२), ३५२ , ३५१ (३), ११८ (२), ७४ , १०९ सह ३ (५ ) भारतीय नवसंहितेनुसार एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी पुढे स्पष्ट केले की, प्राथमिक तपासात आरोपींची ओळख पटली आहे. त्यांना अटक करण्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत आणि तपास सुरु आहे.

मात्र, पीडित कुटुंबीयांनी पोलिसांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आरोप केला आहे की त्यांच्याशी असभ्य वागणूक दिली जात आहे आणि प्रकरणात हेतुपुरस्सर दिरंगाई केली जात आहे.

श्रुती शिरोडकर यांचे मेहुणे अमन शिरोडकर यांनी सांगितले की, हा हल्ला सोमवारी संध्याकाळी झाला. तक्रार त्याच रात्री नोंदवण्यात आली होती. तरीही अद्याप कोणालाही अटक झालेली नाही. हल्लेखोरांची संख्या २० च्या आसपास होती. त्यामध्ये दोन पोलिस कर्मचारी आणि एक वीज खात्याचा कर्मचारी देखील होता.

ते पुढे म्हणाले की , आमच्याकडे काही आरोपींचे फोटो आहेत, त्यांची ओळखही पटली आहे. तरीही पोलिस त्यांच्यावर कारवाई करत नाहीत. रात्रभर आम्ही पोलिस ठाण्याबाहेर थांबलो होतो, आशा होती की आरोपींना अटक होईल. पण काहीच घडलं नाही. पोलिस जर आरोपींना अटक करू शकत नसतील, तर त्यांनी स्पष्ट सांगावं.

कुटुंबीयांचा दावा आहे की, त्यांनी तीन आरोपींची ओळख आधीच पोलिसांना दिली असून त्यापैकी दोन आरोपी उघडपणे परिसरात फिरत आहेत. मात्र, पोलिसांकडून कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. त्यांनी हे ही सांगितले की, एका राजकीय नेत्याकडून फोन येऊन तडजोडीचा प्रस्ताव देण्यात आला होता.

ही संपूर्ण घटना सोमवारी सायंकाळी घडली. हळदोण येथील नाचिनोलचे रहिवासी विवेक आणि श्रुती शिरोडकर हे आपल्या व्यवसायासाठी फूड व्हॅन उघडत होते. तेव्हा पार्किंगच्या किरकोळ वादावरून त्यांच्यावर सुमारे २५ अज्ञात व्यक्तींच्या गटाने लोखंडी रॉड, लाकडी दांड्या, चॉपर आणि चाकूंसह हल्ला केला.

या क्रूर हल्ल्यात विवेक शिरोडकर यांना व्हॅनमधून खेचून बाहेर काढून बेदम मारहाण करण्यात आली, तर त्यांच्या तीन महिन्यांची गर्भवती पत्नी श्रुतीवरही हल्ला करण्यात आला. या गंभीर घटनेमुळे स्थानिकांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं असून, पोलिसांकडून तात्काळ आणि कठोर कारवाईची मागणी होत आहे.

---

# गॅस सिलिंडर्सचा काळा बाजार करणारी टोळी जेरबंद

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ १७४ सिलिंडर्स आणि २ वाहने जप्त

**मडगाव, दि. ३ :** एलपीजी गॅस चोरीच्या मोठ्या रॅकेटमध्ये कोलवा पोलिसांनी सोमवारी रात्री उशिरा सूरावली - बांद मधून वेगवेगळ्या आकाराचे सुमारे १७४ घरगुती गॅस सिलिंडर आणि दोन वाहने जप्त केले आहेत.पोलिसांनी संशयावरून राजस्थानमधील पाच मूळ रहिवाशांना अटक केली आहे, ज्यात बीएनएसएसच्या कलम ३५ अंतर्गत राकेश कुमार (२६), प्रदीप (२०), बनवरलाल (२५) मनफूल बिश्नोई आणि कमल मानझू यांचा समावेश आहे.

पोलिसांनी मडगाव येथील कायदेशीर मापन निरीक्षक आणि मडगाव येथील नागरी पुरवठा निरीक्षक यांना सिलिंडरची तपासणी करून योग्य कारवाई करण्याची विनंती केली आहे.

पीएसआय प्रशांत भगत यांच्या नेतृत्वाखाली कोलवा पोलिसांच्या पथकाने मध्यरात्री गस्त घालत असताना ही घटना उघडकीस आली. जेव्हा पथक सुरावली बांद येथे पोहोचले तेव्हा त्यांना एका खोलीजवळ गॅस सिलिंडरने भरलेले दोन मिनी पिकअप पार्क केलेले आढळले, तर पाच पुरुष व्यक्ती घरगुती गॅस सिलिंडरमधून व्यावसायिक गॅस सिलिंडरमध्ये गॅस भरण्यात आणि वाहनांमध्ये भरण्यात व्यस्त असल्याचे दिसून आले.

एका विशिष्ट वेळी एका प्रकाश नसलेल्या ठिकाणी त्यांच्या उपस्थितीबद्दल विचारपूस केली असता, पाच जण अस्वस्थ झाले आणि त्यांनी गॅस सायफन करण्याबद्दल अस्पष्ट उत्तरे देऊ लागले.

सिलिंडरच्या तपशीलांबद्दल अधिक विचारपूस केली असता, त्यांनी सांगितले की त्यांच्याकडे ताब्यात असलेल्या सिलिंडरचे कोणतेही कागदपत्रे किंवा बिले नाहीत. त्यांनी पुढे मान्य केले की त्यांच्याकडे कोणतेही गोडाऊन किंवा स्टोरेज नाही, अधिकृत डीलरचे नोंदणीकृत कार्यालय नाही, ज्यामुळे पोलिस पथकाला घरगुती सिलिंडरमधून व्यावसायिक गॅस सिलिंडरमध्ये गॅस सायफन करण्याच्या काही व्यक्ती संशयास्पद कृत्यात गुंतल्याचा संशय आला.

कोलवा पोलीस निरीक्षक अरुण देसाई यांनी माहिती दिली की घरगुती गॅस सिलिंडरची तपासणी केली असता, प्लास्टिक सील नसल्याचे दिसून आले, तर काही सिलिंडर जड आढळले, जड सिलिंडर गॅस सायफन करून भरले असल्याचा संशय आला. या पाच जणांनी अधिकाऱ्यांनी दिलेले कोणतेही कागदपत्र किंवा परवानग्या दिल्या नाहीत. सभोवतालची तपासणी केली असता, असे दिसून आले की काही खोल्या सिमेंटच्या पडदी असलेल्या आहेत आणि दोन्ही वाहने एका खोलीजवळ पार्क केलेली दिसली आणि खोलीत घरगुती गॅस सिलिंडर देखील उपलब्ध होते, असे पोलिसांनी सांगितले.

---

# बांबोळी मधील हॉटेल प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलली

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ३ :** अल्पसूचनेवर कार्यकर्त्यांकडून नाराजी व्यक्त केल्यानंतर गोवा कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटीने (जीसीझेडएमए) बांबोळी मधील एका प्रस्तावित तारांकित हॉटेल प्रकल्पासंदर्भातील सुनावणी पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे प्रकरणातील तक्रारदारांना न्याय्य व पारदर्शक संधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

गोवा ग्रीन ब्रिगेडचे संयोजक अव्हर्टिनो मिरांडा यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया देताना सांगितले, सीआरझेड (कोस्टल रेग्युलेशन झोन) नियमांचे उल्लंघन झाल्याचा आरोप असलेल्या प्रकरणात तक्रारदारांना न्याय मिळावा, यासाठी आम्ही जीसीझेडएमए कडे वेळेवर आणि योग्य सूचना देण्याची मागणी केली होती. प्राधिकरणाने आमच्या मागणीची दखल घेत सुनावणी पुढे ढकलली, याचे समाधान आहे.

मिरांडा यांनी स्पष्ट केले की, पूर्वी प्राधिकरणाने फक्त साडेतीन तास आधी नोटीस दिली होती. त्यामुळे पूर्वनियोजित कामांमुळे तक्रारदारांना सुनावणीला हजर राहणे शक्य झाले नव्हते. त्यांनी किमान १० दिवस आधी नोटीस देण्यात यावी, अशी मागणी केली होती.

कोलवा सिविक अँड कंझ्युमर फोरमच्या ज्युडिथ अल्मेडा यांनी देखील या संदर्भात नाराजी व्यक्त करत सांगितले की, सुनावणीच्या एक दिवस आधी, म्हणजे सोमवार सकाळीच पोस्टाने पत्र प्राप्त झाले आणि मंगळवारीच सुनावणीसाठी हजर राहण्यास सांगण्यात आले. अशा पद्धतीमुळे आमचा सहभाग कठीण होतो.

जीसीझेडएमएने आता पुढील सुनावणी १० जून २०२५ रोजी घेण्याचे निश्चित केले आहे.

बांबोळी येथे प्रस्तावित असलेल्या हॉटेल प्रकल्पाविरोधात सांतआंद्रेचे आमदार विरेश बोरकर, अव्हर्टिनो मिरांडा, ज्युडिथ अल्मेडा, ग्लेन काब्राल, आदित्य परुळेकर, समील वळवईकर , शेना गावकर आणि मोहिनी गावकर यांनी तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, सदर प्रकल्पात सीआरझेड नियमांचे उल्लंघन झाल्याचा आरोप आहे. या पार्श्वभूमीवर जीसीझेडएमए ने संबंधित हॉटेल व्यावसायिकाला कारणे दाखवा व काम थांबवण्याचे आदेश पूर्वीच दिले होते. मात्र, व्यावसायिकाकडून उत्तर देताना सांगण्यात आले की त्यांनी २३ जानेवारी २०२१ रोजीच जीसीझेडएमए कडून आवश्यक परवानगी घेतली होती. तसेच, समुद्राच्या तीव्र लाटांमुळे पूर्वी उभारलेली गॅबियन वॉल कोसळली असून, ती पुन्हा उभारण्याचे काम सुरू होते, असा दावा त्यांनी केला.

१३ मे रोजी झालेल्या जीसीझेडएमए च्या बैठकीत दोन्ही पक्ष अनुपस्थित राहिल्याने प्रकरण पुढे ढकलण्यात आले आणि पुढील सुनावणी १ जुलै २०२५ रोजी निश्चित करण्यात आली. मात्र, २३ मे रोजी हॉटेल व्यावसायिकाने प्राधिकरणाला पत्र पाठवून पावसाळ्यापूर्वी स्टॉप वर्क ऑर्डर मागे घ्यावी, अशी विनंती केली होती. यासंदर्भात निर्णय घेत जीसीझेडएमए ने २९ मे रोजीच्या बैठकीत ३ जून रोजी वैयक्तिक सुनावणी घेण्याचे ठरवले. परंतु तक्रारदारांकडून वेळेअभावी आक्षेप नोंदवण्यात आल्याने, आता सुनावणी १० जून रोजी घेण्यात येणार आहे.

---

# गोवा-सिंधुदुर्ग सीमेवरील महिला तस्करी रोखण्यासाठी सामूहिक पुढाकार

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ३ :** राज्यात गेली २५ वर्षे लैंगिक तस्करीविरोधी कार्यरत असलेली स्वयंसेवी संस्था अर्झ' (अन्य रहित जिंदगी) ने महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात जिल्हा विधी सेवा प्राधिकरण (डीएलएसए ), सिंधुदुर्ग यांच्या सहकार्याने एक महत्त्वपूर्ण सल्लामसलत आयोजित केली. गोवा-सिंधुदुर्ग सीमाभागातील महिला व मुलींच्या तस्करीस प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने ही चर्चा घेण्यात आली. या उपक्रमाला आंतरराष्ट्रीय संस्था 'एकपॅट लक्झेंबर्ग' यांचा पाठिंबा लाभला.

गोव्यातील म्हापसा येथील बसस्थानक परिसरात दीर्घकाळापासून लैंगिक व्यवसायात अडकलेल्या महिलांना पुनर्वसनासाठी 'विश' नावाची सुविधा उभारणाऱ्या अर्झ संस्थेच्या निरीक्षणात, अशा अनेक महिला सिंधुदुर्ग जिल्ह्यातून आल्याचे आढळून आले. यामुळेच सिंधुदुर्गमधील तस्करीचे मूळ कारण शोधून त्यावर उपाययोजना करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

या सल्लामसलतीचे उद्घाटन सिंधुदुर्गचे प्रधान व सत्र न्यायाधीश आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष एच. बी. गायकवाड यांच्या हस्ते झाले. सुमारे १०० प्रतिनिधींनी या सत्रात सहभाग नोंदवला, ज्यात न्यायालयीन अधिकारी, वकील, पॅरा-लीगल स्वयंसेवक, महिला व बालकल्याण विभागाचे अधिकारी, पोलिस, एनजीओ प्रतिनिधी, कामगार संघटनांचे प्रतिनिधी तसेच बाल कल्याण समिती सदस्य यांचा समावेश होता.

कार्यक्रमात 'अर्झ'चे डॉ. रूपेश पाटकर आणि सायली गोसावी यांनी सिंधुदुर्ग ते गोवा या मार्गावर होणाऱ्या लैंगिक तस्करीच्या घटनांचा तपशीलवार आढावा सादर केला. यामध्ये आकडेवारीसह सामाजिक, आर्थिक आणि संरचनात्मक कारणांवर प्रकाश टाकण्यात आला. अरुण पांडे यांनी तस्करीविरोधी कायद्यांची अंमलबजावणी, पोलीस यंत्रणेची जबाबदारी आणि न्यायसंस्थेची भूमिका स्पष्ट केली.

गोवा राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या सदस्य सचिव आणि निवृत्त न्यायाधीश सायोनारा टेलेस यांनी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण च्या धोरणात्मक भूमिकेचा ऊहापोह करताना, लैंगिक कामगारांच्या पुनर्वसनासाठी धोरणात्मक पावले उचलण्याची गरज अधोरेखित केली. वरिष्ठ वकील संदीप निंबाळकर यांनी पुढील टप्प्यांसाठी ठोस मार्गदर्शन दिले. कार्यक्रमाच्या शेवटी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सिंधुदुर्गचे सदस्य सचिव न्यायाधीश संपूर्ण गुंडवाडी यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. सल्लामसलतीच्या शेवटी, सिंधुदुर्ग व गोवा या सीमाभागात महिलांच्या तस्करीला आळा बसावा यासाठी सामूहिक कृती आराखडा तयार करण्याची आवश्यकता मान्य करण्यात आली. यासाठी दोन्ही राज्यांतील संबंधित यंत्रणा, स्वयंसेवी संस्था आणि कायदेशीर सेवा प्राधिकरण यांच्यात सातत्याने समन्वय ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

---

# गोव्याच्या किनारपट्टीवर सस्तन प्राण्यांच्या मृत्यूंची चिंता वाढली

■ टीम दैनिक हेराल्ड

**एका महिन्यात २३ अडकलेले सागरी सस्तन प्राणी सापडले**

**मडगाव, दि. ३ :** गोव्याच्या किनारपट्टीवर सस्तन प्रजातींच्या प्राण्यांच्या अडकण्याच्या घटनांमध्ये अलिकडच्या काही आठवड्यांत मोठी वाढ झाली आहे. मागील एका महिन्यात अशा २३ घटना नोंदवण्यात आल्या असून, अनेक मृत प्राणी विविध समुद्रकिनाऱ्यांवर सापडले आहेत. या घटनांमुळे संवर्धन क्षेत्रातील कार्यकर्ते आणि राज्य यंत्रणा सतर्क झाल्या आहेत.

अडकलेल्या प्राण्यांमध्ये मुख्यतः स्टेनेला वंशातील डॉल्फिन्स, हिंद महासागरातील हंपबॅक डॉल्फिन (सौसा प्लम्बिया) आणि इंडो-पॅसिफिक फिनलेस पोर्पॉइसेस (निओफोकेना फोकेनोइड्स) यांचा समावेश आहे. हे सर्व प्राणी भारताच्या वन्यजीव संरक्षण कायद्याच्या अनुसूची-१ अंतर्गत येत असल्यामुळे त्यांना सर्वोच्च संरक्षणाचा दर्जा आहे.

रीफवॉच मरीन कॉन्झर्वेशन आणि गोवा वन विभागाच्या संयुक्त निरीक्षणानुसार, या मृत्यूंमध्ये मानवी हस्तक्षेपाची शक्यता आहे. शवविच्छेदन अहवालांमध्ये अनेक प्राण्यांच्या पृष्ठीय, पुच्छ आणि पेक्टोरल फिन्सवर गंभीर जखमा आढळल्या असून, काही प्राण्यांच्या फुफ्फुसांनाही नुकसान पोहोचल्याचे निदर्शनास आले आहे. अनेक प्राणी अत्यंत कुजलेल्या अवस्थेत सापडले. मात्र त्यांच्यावर झालेल्या बाह्य आघातांमुळे हे बायकॅच प्रकरण असण्याची शक्यता आहे . विशेषतः मोठ्या ट्रॉल किंवा पर्स-सीन मासेमारीमुळे अशी परिस्थिती उद्भवते, असे रीफवॉचने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

गोव्याचे मुख्य वन्यजीव रक्षक के. रमेश कुमार यांनी या घटनांची गंभीर दखल घेतली असून, ही परिस्थिती चिंताजनक आहे. यावर तातडीने उपाययोजना राबवल्या जातील. सागरी जैवविविधतेच्या रक्षणासाठी शासन कटिबद्ध आहे, असे त्यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले. गोवा वन विभाग आणि रीफवॉच २०२१ पासून संयुक्तरित्या सागरी वन्यजीवांच्या अडकल्याच्या घटनांवर निरीक्षण ठेवून आहेत. या कालावधीत सिटेशियन, समुद्री कासव, व विविध समुद्री पक्ष्यांच्या ८०० हून अधिक घटनांमध्ये त्यांनी हस्तक्षेप केला आहे.

फक्त मृत प्राण्यांचे शवविच्छेदन न करता, जिवंत अडकलेल्या प्राण्यांचेही बचाव आणि पुनर्वसन करण्याचे काम रीफवॉचच्या पशुवैद्यकीय पथकांनी केले आहे. वैद्यकीय उपचारांनंतर हे प्राणी पुन्हा त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सोडले जातात. हे सर्व हस्तक्षेप समुद्री परिसंस्थेतील धोके आणि ट्रेंड समजून घेण्यासाठी महत्त्वाचे ठरतात. संरक्षण उपाय योजनांना अधिक प्रभावी बनवण्यासाठी या माहितीचा उपयोग होतो, असे रीफवॉचच्या अधिकाऱ्याने सांगितले. सागरी जीवांना होणारे नुकसान टाळायचे असेल तर जनजागृती आणि स्थानिक समुदायांचा सक्रिय सहभाग अनिवार्य आहे.

१९९४ मध्ये प्रल्हाद आणि मिताली काकर यांनी स्थापन केलेली रीफवॉच ही संस्था भारतातील प्रमुख सागरी संवर्धन संस्थांपैकी एक मानली जाते. संशोधन, शिक्षण आणि वन्यजीव पुनर्वसन या माध्यमातून ती सागरी परिसंस्थेच्या दीर्घकालीन टिकावासाठी कार्यरत आहे.

---

# डासांच्या कॉइलमुळे घरात आग

■ टीम दैनिक हेराल्ड



**वृद्ध जोडपे थोडक्यात बचावले**

**फोंडा, दि. ३ :** शांतीनगर-फोंडा येथील एका घरात डासांना पळवण्यासाठी लावलेल्या कॉइलमुळे लागलेल्या आगीत अंदाजे दोन लाख रुपयांचे नुकसान झाले. मात्र, घरात राहत असलेले वृद्ध जोडपे थोडक्यात बचावले. पोंडा अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेऊन आगीवर नियंत्रण मिळवले.

मिळालेल्या माहितीनुसार, या घरात केवळ एक ज्येष्ठ नागरिक जोडपे राहते. सोमवारी पहाटे पाचच्या सुमारास ही घटना घडली. डासांपासून संरक्षण मिळावे म्हणून रात्री डासांची कॉइल पेटवण्यात आली होती. अगरबत्तीचा वास त्रासदायक वाटत असल्याने, पत्नीच्या विनंतीवरून पतीने ती कॉइल विझवली होती. मात्र, अग्निशमन विभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार, ती पूर्णपणे विझवली गेली नसावी. त्यामुळे रात्री झोपलेले असताना कॉइलने पेट घेतला असावा, असा संशय व्यक्त करण्यात येतो.

आगीची माहिती मिळताच फोंडा अग्निशमन दलाच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि आगीवर नियंत्रण मिळवले. यामध्ये घरातील काही इलेक्ट्रॉनिक उपकरणे, फर्निचर, आणि इतर मौल्यवान वस्तू जळून खाक झाल्या असून छतालाही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सुदैवाने, ही आग स्वयंपाकघरापर्यंत पोहोचली नाही आणि त्यामुळे मोठी दुर्घटना टळली.

या घटनेमुळे परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून वृद्ध दांपत्य सुखरूप असल्याने स्थानिकांनी दिलासा व्यक्त केला आहे. तसेच, अशा घटनांपासून बचाव करण्यासाठी डासांची कॉइल किंवा अगरबत्त्या वापरताना विशेष काळजी घेण्याचे आवाहन स्थानिक प्रशासन व अग्निशमन विभागाने नागरिकांना केले आहे.